# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:10.06.2025** **वार:मंगळवार**

---

1. 140 कोटी भारतीयांच्या सामूहिक सहभागामुळे देशात विविध क्षेत्रांमध्ये जलद परिवर्तन झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रारंभ
3. ऊस पिकाच्या उत्पादनवाढीकरता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी शेतकऱ्यांना कर्ज मिळणार-उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा आणि
4. ठाण्याजवळ लोकलमधून पडल्यानं 4 जणांचा मृत्यू, 9 जखमी; राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**11वर्षे**

140 कोटी भारतीयांचे आशीर्वाद आणि सर्वांच्या सामूहिक सहभागामुळे गेल्या 11 वर्षांत देशात विविध क्षेत्रांमध्ये वेगवान परिवर्तन घडलं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेतृत्वाखालील सरकारला 11 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी काल समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला. ऐकुया एक वृत्तांत माझे सहकारी प्रशांत जाधव यांच्याकडून......

**'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या तत्त्वानुसार काम करत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने जलद गतीनं, सर्वसमावेशक आणि संवेदनशीलतेनं अभूतपूर्व बदल घडवून आणले आहेत, असं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. आर्थिक विकासापासून ते सामाजिक उन्नतीपर्यंत विविध क्षेत्रात सरकारने लोककेंद्रित, सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य दिलं असल्याचं मोदी यांनी अधोरेखित केलं. आज भारत फक्त सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्थाच नाही तर हवामान बदल आणि डिजिटल नवोन्मेष यासारख्या महत्त्वाच्या विषयांचं एक प्रमुख जागतिक केंद्र देखील आहे. विकसित भारताच्या उभारणीचा नवा संकल्प, नवी आशा, आणि आत्मविश्वासानं भारताची प्रगतिपथावर वाटचाल सुरू आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. नमो ॲपवर विविध चित्रफिती, इन्फोग्राफिक्स आणि लेखांच्या माध्यमातून भारताच्या विकास यात्रेची गाथा मांडण्यात आली आहे, नागरिकांनी नमो ॲपवरील ही माहिती जाणून घ्यावी असं आवाहनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.**

**पर्यावरण**

गेल्या दशकात, भारतानं पर्यावरण संरक्षण आणि समावेशक विकासाला एकत्रित करणारे विकास प्रारूप स्वीकारले आहे. नमामि गंगे मिशन हा जगातील सर्वांत मोठ्या नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमांपैकी एक आहे. यासोबतच, स्वच्छ भारत मिशन आणि गोबरधन योजनेनं स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनात बदल घडवून आणला आहे, “एक पेड माँ के नाम” सारख्या मोहिमांमुळे पर्यावरणीय कृतीसाठी नागरिक एकत्र येत आहेत. तर वन्यजीव संवर्धनात प्रोजेक्ट चित्ता, प्रोजेक्ट लायन यासारखे उपक्रम प्रजातींच्या रक्षणावर लक्ष केंद्रित करतात. भारताचे हरित परिवर्तन हा केवळ धोरणात्मक उपक्रम नाही, तर ती लोकचळवळ बनली आहे.

**भारतगौरव ट्रेन**

राज्यात काल तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त रायगडावर शिवभक्तांनी गर्दी केली होती. या निमित्तानं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणारी 'छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वे' देखील कालपासून सुरू झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस

इथून हिरवा झेंडा दाखवून या रेल्वेला रवाना केल. या पर्यटन रेल्वेच्या माध्यमातून प्रवाशांना पुण्यातील लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती, शिवनेरी आणि भीमाशंकर इथं भेट देता येणार आहे.

**शिवराज्याभिषेक-रायगड**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचं जतन आणि संवर्धन करून हे किल्ले अतिक्रमण मुक्त करायला हवेत असं मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. 352वा शिवराज्याभिषेक सोहळा काल किल्ले रायगडावर साजरा करण्यात आला; त्यावेळी शिंदे बोलत होते. पाचाड इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्याची माहिती देणारी शिवसृष्टी उभारली जाईल, त्यासाठी सरकार सर्व प्रकारची मदत करेल, अशी ग्वाही शिंदे यांनी यावेळी दिली.

**ऊस उत्पादन-अजित पवार**

ऊसाच्या पिकाच्या उत्पादनाकरता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये कर्ज देण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल केली. पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट इथं ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, या विषयावरील चर्चासत्रात बोलताना पवार म्हणाले.....

**माझा महाराष्ट्रातला शेतकरी नक्कीच कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजेच एआय या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रयत्नशील राहील.हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर निश्चितपणे चांगला होईल. हे तंत्रज्ञान ऊस शेतीच्या साठी क्रांतिकारक पाऊल ठरणार आहे आणि यातूनच काही धोरणात्मक निर्णय ज्या ज्या वेळेस नवीन तंत्रज्ञान येतं नवीन कुठलं आपण कार्यक्रम आणतो त्यामध्ये, अनुभवातून काही काही गोष्टी शिकायला मिळतात. जसं जसं हे राबवत असताना ज्या ज्या गोष्टी आपल्याला जाणवतील त्या दूर करण्याच्याकरता हे राज्य सरकार देवेंद्रजी, एकनाथराव, मी आणि माझी सगळी टीम आमची मंत्रिमंडळाची आम्ही सगळे जण शेतकऱ्यांच्या बरोबर आहोत. फक्त डोळ्यासमोर बळीराजा शेतकरी साखर कारखाने यांनाच डोळ्यासमोर ठेवलं जाईल तशा पद्धतीच तंत्रज्ञान वापरलं जाईल.**

ज्येष्ठ नेते शरद पवार, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**अजित पवार-पुणे**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते देशातील पहिल्या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याचा प्रारंभही काल पुण्यात हडपसर इथं झाला. बीड जिल्ह्यातील डॉ. हनुमंत आणि डॉ. स्वाती शेळके या दांपत्याने 2030पर्यंत रेबीज निर्मूलन करण्याचं ध्येय समोर ठेऊन हे रुग्णालय सुरू केलं आहे. राज्यात पहिल्यांदाच पुणे जिल्ह्यात आयोजित केलेल्या महसूल लोक अदालतीचं उद्घाटनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल झालं. राज्यातील सर्व विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी अत्याधुनिक बहुउद्देशीय वाहनं देण्याचा राज्य शासनाने घेतला आहे; ही वाहनं यावर्षी महसूल विभागाला दिली जातील, अशी घोषणा अजित पवार यांनी यावेळी केली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**रेल्वे अपघात-मुंबई**

ठाण्याजवळ मध्य रेल्वेच्या दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या उपनगरी रेल्वेगाडीतून पडून काल चार प्रवाशांचा मृत्यू झाला तर नऊ जण जखमी झाले. मृतांच्या वारसांना प्रत्येकी 5 लाख रुपयाची आर्थिक मदत देण्यात येईल आणि जखमींवर सरकारी खर्चाने उपचार केले जातील अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

**विमानसेवा**

सोलापूर-गोवा विमान सेवेचा केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते काल प्रारंभ झाला. येत्या ऑगस्टपासून सोलापूरहून मुंबई आणि त्यानंतर बेंगलोर, तिरुपती, हैद्राबाद आदि ठिकाणी विमानसेवा सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मोहोळ यांनी यावेळी दिली.

**<u>पीओपी मूर्ती</u>**

प्लास्टर ऑफ पॅरिसने बनवलेल्या गणेशमूर्तींवरची बंदी मुंबई उच्च न्यायालयाने उठवली आहे. मात्र या मूर्तींचं विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतात करता येणार नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तज्ञ समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे या मूर्तींच्या विसर्जनाची व्यवस्था करावी, तसंच तीन आठवड्यांच्या आत त्याचा अहवाल सादर करावा, असंही न्यायालयानं म्हटलं आहे.

**<u>पुरस्कार</u>**

थोर समाज सुधारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती दिनी दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील 39वा शाहू पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांना काल जाहीर करण्यात आला. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक न्यासाच्यावतीने हा पुरस्कार देण्यात येतो. कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल पत्रकार परिषदेत या पुरस्कारची घोषणा केली. 1 लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<u>पुलोत्सव</u>**

पुलंच्या स्मृती शाश्वत ठेवण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पुलंच्या नावाने अध्यासनाची निर्मिती करावी, अशी इच्छा ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी काल व्यक्त केली. पुण्यात आयोजित 'ग्लोबल पुलोत्सवा'च्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी  ज्येष्ठ गायिका दिवंगत प्रभा अत्रे यांच्या 'स्वरमयी' संस्थेला विशेष पु.ल. पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<u>हवामान-पाऊस-सांगली</u>**

सांगली जिल्ह्यातील तासगाव आणि मिरज तालुक्यात काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. येत्या 24 तासात राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.